प्रेसनोट

लाप्रवि विभाग, नाशिक ,
दिनांक- १९/०९/२०२६

घटक	**नाशिक** , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक	पाथर्डी पोलीस स्टेशन, अहिल्यानगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.
अधिनियम व कलम	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे
आरोपी लोकसेवक नाव व कार्यालय	पोलीस अंमलदार/२४६७ विनोद शिवाजी मासाळकर, नेमणुक- पाथर्डी पोलीस स्टेशन, जि. अहिल्यानगर
स्विकारलेली रक्कम	१,००,०००/-रूपये
तक्रार	थोडक्यात हकीकत :- यातील मुळ तक्रारदार यांच्या हॉटेल वर काम करणारा नोकर मोटार सायकलवर पाथर्डी गावातुन जात असतांना त्याचे एका अनोळखी ट्रक चालकासोबत गाडी ला कट मारला या कारणावरून भांडण होवुन त्यांची आपआपसात मारामारी झाली होती. लोकसेवक यांनी तक्रारदार यास तुमच्या हॉटेल वर काम करणाऱ्या नोकरावर हापमर्डर व रॉबरी चा गुन्हा दाखल करतो असे सांगीतले होते. त्यानंतर तक्रारदार हे लोकसेवक पो.अं/विनोद मासाळकर यांना पाथर्डी पोलीस ठाणेस जावुन भेटले तेव्हा लोकसेवक यांनी तक्रदार यांचे नोकरावर हापमर्डर व रॉबेरी चा गुन्हा दाखल न करता वरीष्ठाना सांगुन सौम्य स्वरूपाचा मारामारीचा गुन्हा दाखल करतो व त्यांना लवकरात लवकर जामीन मंजुर करून तपासात मदत करतो असे प्रलोभन देवुन ५,००,०००/-रूपये ची मागणी केली होती. तक्रारदार यांना लोकसेवक विनोद मासाळकर यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांचेकडे दिनांक १८/०९/२०२६ रोजी तक्रार दिली होती.
तक्रारीची पडताळणी	सदर तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत विभागाने दिनांक १९/०९/२०२६ रोजी पडताळणी कारवाई केली असता लोकसेवक विनोद मासाळकर यांनी तक्रारदार यांचे नोकरावर हापमर्डर व रॉबेरी चा गुन्हा दाखल न करता सौम्य स्वरूपाचा गुन्हा दाखल करून लवकरात लवकर जामीन मंजुर करून तपासात मदत करण्याचे मोबदल्यात तडजोडीअंती २,१५,०००/-रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची संमती दर्शविली.
सापळा कारवाई	आज १९/०९/२०२६ रोजी पाथर्डी पोलीस स्टेशन बाजुच्या पाण्याच्या टाकीजवळ लोकसेवक पो.अं/विनोद मासाळकर यांना तक्रारदार यांचेकडुन तडजोड रकमेतील १,००,०००/- रूपये पंच साक्षीदार यांचे समक्ष स्विकारतांना लाचलुचपत विभागाने रंगेहात ताब्यात घेतले असुन लोकसेवक पो.अं/ विनोद मासाळकर यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वे पाथर्डी पोलीस स्टेशन, अहिल्यानगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.
आरोपी अटक दिनांक व वेळ	आरोपी लोकसेवक यास ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्हा दाखल होतास आरोपी अटकेबाबतची तजबीज ठेवण्यात आली आहे.
सापळा कारवाई	सापळा अधिकारी- पोलीस उपअधिक्षक श्री. संतोष पैलकर, ला.प्र.वि. नाशिक मो.नं.९८२३१०३१०२
	सापळा पथक- पोहवा/२५३८ दिनेश खैरनार, पोहवा/२३५५ अविनाश पवार, पोअं/१०६६ योगेश शिंदे
तपास अधिकारी	श्रीमती सविता तांबे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. अहिल्यानगर मो.नं. ९८३४८९१०१९
मार्गदर्शन	१)मा.श्री. भारत तांगडे, पोलीस अधिक्षक २)मा.श्री. प्रदिप मैराळे, अपर पोलीस उपअधिक्षक

Scanned with OKEN Scanner

	३) मा.श्रीमती कविता फडतरे, अपर पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परीक्षेत्र, नाशिक

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

<u>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक आपले सेवेशी सदैव तत्पर</u>

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net

ईमेल रू- spacbnasik@mahapolice.gov.in

टोल फ्री कमांक :- १०६४

दूरध्वनी कमांक :- ०२५३-२५७५६२८, ०२५३-२५७८२३०

संपर्क क्रमांक

१) ला.प्र.वि. नाशिक व्हटसॲप क्रमांक :- ९९३०९९७७००/९५४५०३१०६४,

२) ला.प्र.वि. जळगाव व्हटसॲप क्रमांक :- ७५७८६६१०६४

३) ला.प्र.वि.अहिल्यानगर व्हटसॲप क्रमांक :- ९१६८६४१०६४.

४) ला.प्र.वि. धुळे व्हटसॲप क्रमांक :- ७७९८१६१०६४

५) ला.प्र.वि. नंदुरबार व्हटसॲप क्रमांक :- ९४२३५४१०६४

19/1/26

(संतोष पैलकर)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक

Scanned with OKEN Scanner